बचत गटातील व्यावसायीक महिलांना कर्ज
• चेक क्लिअरिंग सुविधा
• डी.डी. सुविधा
जय बालाजी अर्बन को-ऑप. क्रेडिट सो.लि.
तापडिया सर्कल, निराला बाजारसमोर, औरंगाबाद. फोन नं. २३३२२६२

सागर प्रकाशनचे
# सांजवार्ता

शनिवार, दि. १० नोव्हेंबर २०१८, औरंगाबाद | सर्वाधिक खपाचे सायंदैनिक | • वर्ष बाविसावे • अंक ७९ वा • पृष्ठे ८ • किंमत २ ₹

### राम मंदिर आंदोलनासाठी मोर्चेबांधणी

नागपूर, दि.१० (वृत्तसंस्था): अयोध्येत राम मंदिर उभारण्याचा मुद्दा सध्या देशभर गाजत असून, राम मंदिरासाठी पुन्हा आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने दिल्यानंतर आता या आंदोलनासाठी मोर्चेबांधणीही सुरु झाली आहे. शनिवारी सकाळी नागपूरमध्ये रेशीमबागेतील संघाच्या मुख्यालयात एका महत्त्वपूर्ण बैठक झाली. राम मंदिरासाठी संघातर्फे हुंकार रॅली काढण्यात येणार असून पहिली हुंकार रॅली संघाच्या भूमीत म्हणजेच नागपूरमध्ये २५ नोव्हेंबर रोजी होणार आहे. आज झालेल्या बैठकीत याबाबत चर्चा झाल्याचे समजते.

e-paper on...
www.sanjwarta.in

## आज शहरात टॉप टेन



१ शिवप्रताप दिनानिमित्त क्रांतीचौकातील शिवाजी पुतळ्याला अभिवादन
२ मौलाना आझाद संशोधन केंद्रात संशोधन कार्यप्रणालीवर कार्यशाळा
३ आनंद बुद्ध विहारात धम्म देसना
४ सिडको एन-२ शनिमंदिरात धार्मिक कार्यक्रम
५ बेगमपुरा कार्यसिद्धी हनुमान मंदिरात आरती
६ गारखेडा परिसरात धार्मिक कार्यक्रम
७ माऊलनगरात हरिनाम सप्ताहास सुरुवात
८ सुपारी हनुमान मंदिरात धार्मिक कार्यक्रम
९ रेल्वे स्टेशन शनिमंदिरात आरती
१० सिडको एन-४ मध्ये महिला बचत गटाची बैठक

गुन्हे शाखेच्या ताब्यात असलेला

# सराईत गुन्हेगार पोलिस आयुक्तालयातून पसार

**औरंगाबाद, दि.१० (सांजवार्ता ब्युरो): गुन्हे शाखेने ताब्यात घेतलेल्या एका सराईत गुन्हेगाराने चक्क पोलिस आयुक्त कार्यालयातून हाथकडीसह पोबारा केल्याची खळबळजनक घटना शुक्रवारी (९ नोव्हेंबर) सकाळी घडली. शेख चाँद (वय ३५ वर्षे) असे पळून गेलेल्या गुन्हेगाराचे नाव आहे. शहरातील मध्यवर्ती बसस्थानक परिसरात शुक्रवारी सकाळी तुटलेली हाथकडी सापडल्यानंतर ही घटना समोर आली. या घटनेने पोलिस दलात मोठी खळबळ उडाली असून,पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.**

पाकिटमारी आणि चेन स्नॅचिंग स्पेशालिस्ट अशी चोरट्यांमध्ये प्रतिमा असलेल्या शेख चाँद (वय ३५ वर्षे) याच्यावर शहरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये अनेक गुन्हे दाखल आहेत. यापूर्वी काही गुन्ह्यांमध्ये शेख चाँदला अटक करण्यात आली होती. त्यामधील काही गुन्ह्यांचे प्रकरण न्यायालयासमोर सुनावणीसाठी आले आहे;परंतु तो न्यायालयात हजर होत नसल्याने चाँदच्या विरोधात न्यायालयाने अजामीनपात्र वॉरंट जारी केले होते.

सूत्रांनी दिलेली माहिती अशी की, गुन्हे शाखेच्या उपनिरीक्षकांचे एक पथक दिवाळी पाडव्याच्या दिवशी म्हणजे गुरुवारी (८ नोव्हेंबर) मध्यरात्री पेट्रोलिंग करीत असताना शेख चाँद हा सेंट्रल नाका भागात फिरत असल्याचे या पथकाच्या निदर्शनास आले. गुन्हे शाखेच्या पथकाने लगेच शेख चाँदच्या



मुसक्या आवळल्या. गुन्हे शाखेच्या पोलिसांनी शेख चाँदला ताब्यात घेल्यानंतर त्याला मध्यरात्री पोलिस आयुक्तालयात ठेवले गेले. रात्रभर राहिल्यानंतर शुक्रवारी सकाळी ८ ते ९ वाजण्याच्या दरम्यान चाँदने संधी साधत पोलिस आयुक्तालयातून पळ काढला. आयुक्तालयातून पळ काढल्यानंतर चाँदने त्याच्या हातात असलेली हाथकडी तोडून मध्यवर्ती बसस्थानक परिसरात फेकली. ही हाथकडी सापडल्यानंतर या खळबळजनक घटनेला वाचा फुटली. या प्रकरणी क्रांती चौक पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

### शिफ्ट चेंजदरम्यान केला पोबारा

पोलिसांची १२ तासाची ड्युटी असते. सकाळी ९ ते रात्री ९ या वेळेत दोन शिफ्ट असतात. पोलिस आयुक्तालयात रात्रभर राहिल्यानंतर सकाळी जेव्हा ८ ते ९ वाजण्याच्या दरम्यान ड्युटीवरील पोलिस कर्मचाऱ्यांची शिफ्ट चेंज होत होती. त्या वेळेस शेख चाँद याने या संधीचा फायदा घेत तेथून पोबारा केला. पोलिस कर्मचाऱ्यांच्या हातावर तुरी देऊन शेख चाँद याने भरदिवसा पोलिस आयुक्तालयातून पळ काढल्यामुळे एकच खळबळ उडाली. या घटनेस जबाबदार कोण, असा प्रश्न उपस्थित केला जात असून, भरदिवसा अट्टल गुन्हेगाराने पळ काढल्यामुळे पोलिसांची अकार्यक्षमता चव्हाट्यावर आली आहे.



शिवप्रताप दिनानिमित्त क्रांतीचौकातील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून मराठा क्रांती मोर्चातर्फे अभिवादन करण्यात आले. (छाया : मंगेश शिंदे)

# तृतीय पंथीयांचा पोलिस ठाण्यात धुडगूस

- कर्मचारी ठाणे सोडून पळाले
- मध्यरात्रीपासून पहाटेपर्यंत नंगानाच
- सहा तृतीय पंथीयांना अटक
- पोलिसांची झाली नामुष्की
- कार्यकर्ते आले मदतीला धावून

औरंगाबाद,दि.१०(सांजवार्ता ब्युरो) : 'नंगे से खुदा भी डरे' याचा प्रत्यय लक्ष्मीपूजनाच्या रात्री (ता. ७) औरंगाबाद पोलिसांना आला. उस्मानपूरा पोलिस स्टेशनमध्ये तृतीय पंथीची छेड काढल्यानंतर शहरातील अनेक तृतीय पंथीय तिथे गोळा झाले आणि त्यांनी पोलिस स्टेशनमध्ये धुडगूस घालत फर्निचरची तोडफोड केली. पोलिसांची महत्त्वाची कागदपत्रे अस्ताव्यस्त केली. तृतीय पंथीयांचे तांडव पाहून पोलिसही चक्रावून गेले. या तृतीय पंथियांना आवरणे कठीण असल्याचे पाहून पोलिसांनी अक्षरशः पोलिस स्टेशनमधून पळ काढला. पहाटे अतिरिक्त कुमक बोलावून त्यांच्यावर नियंत्रण मिळवण्यात पोलिसांना यश आले. तोपर्यंत उस्मानपूरा पोलिस स्टेशनमध्ये होळी आणि दिवाळी एकत्रच साजरी झाली होती. धुडगूस घालणाऱ्या तृतीयपंथीयांविरोधात गुन्हा दाखल झाला असून हा सर्व प्रकार सीसीटीव्हीत कैद झाला आहे.

या बाबतची माहिती अशी की, ७ नोव्हेंबर रोजी उस्मानपुरात पोलिसांनी तृतीयपंथीयांना ने आण करणारी रिक्षा पकडून ठाण्यात आणली. एका तृतीयपंथीयाने रिक्षा चालकास नेहमीप्रमाणे मोबाईल केला. त्यावेळी सदरील रिक्षा चालकाने त्यास सांगितले की, उस्मानपुरा पोलिस ठाण्यात आहे. माझी रिक्षा पकडली आहे. त्यानंतर सदरील तृतीयपंथी ठाण्यात रिक्षा चालकास भेटण्यास आला. त्या ठिकाणी एका हिस्ट्रीशिटर गुन्हेगार जो ठाण्याची ▶▶ पान ८ वर

### कारची काच फुटली

तृत्तीय पंथीयाची छेड काढणारा गुन्हेगार ठाण्यावर चढून पाठीमागून पळाला. यावेळी त्याने ठाण्याच्या आवारात जप्त केलेल्या एका वाहनावर उडी मारली. त्यात कारची काच फुटली व गाडीचे नुकसान झाले. अनेक पोलिस ठाण्यात जुने गुन्हेगार हे खबऱ्याचे किंवा साफसफाईचे काम करतात. सुधारण्यासाठी हे काम करतात पण कधी अशा गुन्हेगारामुळे ठाण्यातील पोलिस कर्मचाऱ्यांवर असा प्रसंग उद्‌भवतो.

खुशखबर खुशखबर खुशखबर
८९ महिन्यात दामदुप्पट
४७ महिन्यात दिडपट
अजिंठा बँक
जाधववाडी: 0240-6600715, 6600720.
उस्मानपुरा: 0240-6600739, 6600745.
Website : www.ajanthabank.com
E-mail : ceo@ ajanthabank.com

### हवेचा अंदाज घेऊन निर्णय घेणार : रामदास आठवले

**मुंबई :** मी १० ते १५ वर्षे कॉंग्रेससोबत होतो. आता भाजपसोबतही मला तितकाच किंबहूना त्याहून अधिक काळ रहावे लागेल. जोपर्यंत सरकार आहे तोवर मी इथेच आहे. नंतर मी हवेचा अंदाज घेऊनच निर्णय घेणार, असे सूचक विधान केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मुंबईत एका कार्यक्रमात केले. त्यामुळे सध्या भाजपला साथ देणारे आठवले हे आगामी काळात भाजपची साथ सोडणार की काय, अशी चर्चा सुरू झाली आहे.



दिवाळी पाडव्यानिमित्त जुन्या शहरात रेड्यांची वाजत गाजत मिरवणूक काढून पूजा करण्यात आली.

# मराठा समाजाकडून राजकीय पक्षाची स्थापना नाही!

■ संभ्रम निर्माण करण्यासाठीच षड्यंत्र ■ मराठा क्रांती मोर्चाचा आरोप

औरंगाबाद, दि.१० (सांजवार्ता ब्युरो): मराठा समाजाकडून राजकीय पक्षाची स्थापना करण्यात आली आहे असे वृत्त धादांत खोटे व निराधार आहे. मराठा समाजात संभ्रम निर्माण करण्याच्या हेतूने रचलेले हे षड्यंत्र असून, समाजाला विशिष्ट अशा दावणीला बांधण्याचा सर्व प्रयत्न हाणून पाडला जाईल, अशी स्पष्ट भूमिका औरंगाबाद येथे आयोजित केलेल्या मराठा क्रांती मोर्चाच्या एका तातडीच्या बैठकीत घेण्यात आली.

या बैठकीत मराठा आरक्षणाचे अभ्यासक राजेंद्र दाते पाटील, किशोर चव्हाण, विजय काकडे, सुनील कोटकर, अंकित चव्हाण, ॲड. सुवर्णाताई मोहिते, संजय तांबे, नितीन कदम, नीलेश ढवळे, शिवाजी जगताप, राहुल बन्सोड, रवींद्र वाहटुळे, रेखाताई वाहटुळे, अमोल साळुंके, कल्याणराव शिंदे आदी उपस्थित होते.मराठा समाजाकडून ▶▶ पान ८ वर

### 'मराठा क्रांती मोर्चा' किंवा 'मराठा' नाव पक्षासाठी वापरू नये

मराठा क्रांती मोर्चा आणि मराठा संघटनांचा विरोध डावलून सुरेश पाटील यांनी नव्या पक्षाची घोषणा करण्याचा घाट घातला असून, हे अत्यंत घातक कृत्य आहे. अशा वृत्तींना मराठा समाज अजिबातच थारा देणार नसल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले. हा प्रयत्न छत्रपती शिवरायांच्या विचारधारेविरुद्ध असल्याचे मत यावेळी अनेक जणांनी व्यक्त केले. मराठा क्रांती मोर्चाने पक्षाचे नाव मराठा क्रांती पक्ष किंवा सकल मराठा पक्ष असे ठेवण्यास सतत व कायम विरोधच केलेला आहे. मराठा क्रांती मोर्चा तथा मराठा या नावामागे मराठा समाजाची अस्मिता दडली असल्यामुळे हे नाव कोणालाही वापरता येणार नसल्याचे या बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

पटलं तर हसा...

**मुलगा :** ओ काका, कुल्फी कितीला आहे?
**कुल्फीवाला :** १०,२०,३० रुपयांना.. मुलगा कुल्फी खातो आणि घरी जायला निघतो.
**कुल्फीवाला :** अरे, पैसे दे की?
**मुलगा :** आमच्या घरचे म्हणत्यात खा, प्या मजा करा.. पण पैशाचा लाड नाही करायचा..!

# उत्तर भारतातील नामांतराचे वारे महाराष्ट्रात शांत

■ सेना-भाजप लोकप्रतिनिधीकडून फक्त पाठपुराव्याचे प्रयत्न

औरंगाबाद, दि.१०(सांजवार्ता ब्युरो) : उत्तर प्रदेशातील भाजपा सरकारने नुकतेच फैजाबादचे अयोध्या आणि इलाहाबादचे प्रयागराज जिल्हा असे नामांतर केले. यापूर्वी मायावती मुख्यमंत्री असतांनाही अनेक जिल्ह्यांना राष्ट्रपुरुषांची नावे देण्यात आली. पण गेल्या तीस वर्षापासून औरंगाबाद जिल्ह्याचे नाव संभाजीनगर करण्यात शिवसेना आणि भाजपाच्या नेत्यांना अपयश आले युतीच्या नेत्यांच्या श्रेय्य वादात शहराचे नामांतर अडकले असल्याचे दिसते. खा. चंद्रकांत खैरे या प्रश्नी मुख्यमंत्र्यांची भेट घेणार आहे. आ. अतुल सावे सरकारकडे पाठपुरावा करणार आहेत.

शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी औरंगाबाद येथे ८ मे १९८८ साली झालेल्या जाहिर सभेत औरंगाबादचे नाव यापुढे संभाजीनगर होणार अशी घोषणा केली त्यानंतर हे प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले. उच्च न्यायालयानंतर सर्वोच्च न्यायालयात गेले. सर्वोच्च न्यायालयाने त्यास स्थगिती दिली. तेव्हापासून नामांतराचे ▶▶ पान ८ वर

### पाठपुरावा करु : आ. सावे



औरंगाबादचे नामांतर झाले पाहिजे ही येथील बहुतांश जनतेची मागणी आहे. पण सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी या प्रकरणी आपण सरकारकडे पाठपुरावा करणार असल्याचे आ. अतुल सावे यांनी सांजवार्ता प्रतिनिधीला सांगितले.

### मुख्यमंत्र्यांना भेटणार : खा. खैरे



औरंगाबादचे नाव बदलून संभाजीनगर करण्याची घोषणा शिवसेनाप्रमुखांनी १९८८ साली केल्यापासून आम्ही संभाजीनगरच उल्लेख करतो. पण शासन स्तरावर नामांतर व्हावे यासाठी आपण मुख्यमंत्र्यांना चार वेळेस भेटलो. यानंतरही आपण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना भेटणार असल्याचे खा. खैरे यांनी सांगितले.

# शहरात प्रदूषणाची पातळी वाढली

औरंगाबाद, दि.१० (सांजवार्ता ब्युरो) : दिवाळीच्या दिवसात शहरातील प्रदूषणाची पातळी चांगलीच वाढली असून कचऱ्याचे प्रदूषण धोकादायक पातळीवर पोहोचले आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर फटाक्यांचा आवाज काहीसा कमी झाला असला तरी हवा आणि पाण्याचे प्रदूषण मात्र शहरवासीयांच्या आरोग्यावर परिणाम करणारे ठरत आहे.

यावर्षी सर्वोच्च न्यायालयाने कठोर नियमांचे पालन न करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याचे आदेश दिले होते. त्याच बरोबर रात्री आठ ते दहा या वेळेतच फटाके फोडण्याची मुभा दिली होती. या नियमाचे उल्लंघन झाले असले तरी आवाजाची पातळी आणि प्रदूषण आवाक्यात ठेवण्यात यश आले आहे. त्यामुळे यावर्षी प्रदूषण काहीसे नियंत्रणात राहिले असल्याचे दिसते. शहरातील हवेचे प्रदूषण ८५ वर पोहोचले आहे. तर पाण्याचे प्रदूषण ५० टक्क्यांवर गेले आहे. हवेतील प्रदूषणाची पातळी साधारणता ६० ते ६५ टक्के होती. दिवाळीच्या काळात ही पातळी ८५ टक्क्यांवर पोहोचली आहे. फटाक्यांच्या आवाजाची मर्यादा १२५ ते १४५ डेसिबल एवढी ठेवण्यात आल्याने हवेचे प्रदूषण फारसे वाढले नसल्याचे दिसते. आवाजाचे प्रदूषण ६० टक्क्यांवर पोहोचल्या माहिती सहा.उपसंचालक पोटघरे यांनी दिली.

### कचरा बनतोय जीवघेणा

शहराची प्रदूषण पातळी वाढविण्यात कचऱ्याचा मोठा हातभार लागला आहे. गेले वर्षभर कचरा कोंडी शहरवासीय त्रस्त करीत असताना दिवाळीच्या दिवसात कचऱ्याचे प्रदूषण प्रचंड प्रमाणात वाढले. ही पातळी धोक्याच्या बाहेर नसली तरी येत्या काही दिवसात या प्रदूषणात आणखी वाढ होणार असल्याचा धोका तज्ज्ञांनी व्यक्त केला आहे. कचऱ्याचे प्रदूषण ८० टक्क्यांवर पोहोचले आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार ही पातळी खूपच अधिक आहे. हवेतील तसेच पाण्यातील प्रदूषणापेक्षा कचऱ्यापासून झालेले प्रदूषण सर्वाधिक त्रासदायक ठरणारे आहे. विशेषतः शहरातील मध्यवस्तीत कचऱ्याचे मोठे प्रदूषण पसरत आहे.यावर तातडीने उपाय शोधला गेला पाहिजे असा इशारा प्रदूषण मंडळाने दिला आहे.

### असं म्हणता...



गुरुदेव..! या नव्या परिधानात तुम्हाला ओळखलंच नाही..!

दिव्यांगांवर अन्याय... जि.प. समाजकल्याण विभागाचा नाकर्तेपणा

# 'अपंग कल्याण'चे नियोजन न केल्याने दीड कोटींचा निधी पडून!

■ संजय बनकर

औरंगाबाद, दि.१० : जिल्हा परिषदेच्या एकूण उत्पन्नातून ३ टक्के रक्कम ही दिव्यांगाच्या उत्थानासाठी वापरण्याचा नियम असूनही यंदा त्याचे नियोजन न झाल्याने १ कोटी ४२ लाख ९२ हजार ५३४ रुपये पडून आहेत. यामुळे अपंगावर अन्यायच झाला आहे.

जिल्हा परिषदेच्या उपकरातून ५३ टक्के निधी समाजकल्याण विभागाला दिला जातो. यातून २० टक्के समाजकल्याण, २० टक्के पाणीपुरवठा, १० टक्के महिला व बालकल्याण व दिव्यांगाच्या कल्याणासाठी ३ टक्के निधी खर्च करणे अपेक्षित आहे. सन २०१७-१८ या वर्षाच्या अर्थसंकल्पात ४७ कोटी ६४ लाख १७ हजार ८०० रुपये आहे. यात ५३ टक्के राखीव निधीमध्ये समाजकल्याण विभागासाठी ९ कोटी ५२ लाख ८३ हजार ५६० रुपये,



महिला व बालकल्याण विभागाला १० टक्के हिशेबाने ४ कोटी ७६ लाख २१ हजार ७८० रुपये व अपंगाच्या कल्याणासाठी ३ टक्केच्या हिशेबाने १ कोटी ४२ लाख ९२ हजार ५३४ रुपये असे एकूण २५ कोटी २४ लाख ८३ हजार ५६० रुपये राखीव निधी उपलब्ध आहे. हा पैसा ३१ मार्चपर्यंत खर्च करणे आवश्यक आहे.

समाजकल्याण, पाणीपुरवठा, महिला व बालकल्याण विभागाने प्राप्त निधी खर्चाचे नियोजन करण्यात आले आहे, परंतु अपंगाच्या कल्याणासाठीचे नियोजन करण्यात आले आहे, परंतु अपंगाच्या कल्याणासाठीचे नियोजन करण्यात आलेले नाही. आगामी ५ महिन्यात नियोजन करणे, लाभार्थींची निवड व प्रत्यक्ष लाभ देणे अवघड होणार आहे. खरे तर 'अपंग कल्याण'चे नियोजन सर्वात अगोदर होणे अपेक्षित होते. परंतु तसे झाले नाही. एकूणच अपंगावर अन्यायच झाला आहे. तो दूर करावा, अशी अपेक्षा समाजकल्याण अधिकारी अंबेकर यांच्याकडून केली जात आहे.

# जि.प. मार्फत कचराकुंड्या रद्द

■ पिकोफॉल मशिन्ससाठी २७ लाखांची तरतूद

औरंगाबाद, दि.१०(सांजवार्ता ब्युरो) : ग्रामपंचायत मार्फत खरेदी केल्या जाणाऱ्या कचराकुंड्यासाठी नियोजित २५ लाख रुपयांचा निधी आता पिकोफॉल मशिन्ससाठी खर्च केला जाणार आहे. पिको फॉलसाठी आतापर्यंत २७ लाख रुपये खर्च करण्यात आला असल्याचे जि.प. अध्यक्षा ॲड. देवयानी पाटील डोणगावकर यांनी सांगितले.

कचरा कुंड्यांचा लाभ घेणाऱ्या ग्रामपंचायती नाममात्र १० किलो कचरा क्षमतेच्या फायबरच्या बकेटसाठी १६२४९ रुपयांचे बिल जि.प.ला सादर करत होत्या. साकेत व पॉलिमर एजन्सीच्या या बकेट बाजारात नाममात्र ३ हजार रुपयांना मिळते; परंतु याच एका बकेटची ग्रामपंचायतमार्फत खरेदी केल्यानंतर १६२४९ रुपयांचे बिल मिळवून ते जिल्हा परिषदेत सादर केले जाते. यात अनियमितता आहे, असा आरोप जि.प. सदस्य एल.जी. गायकवाड यांनी केला होता. यावरुन आता ग्रामपंचायतीने कचरा बकेट खरेदी करु नये, यासाठी असलेला निधी पिकोफॉल मशीन्ससाठी वर्ग करण्यात आलेला आहे. या मशिन्ससाठी असलेला १७ लाख रुपयांचा निधी आता २७ लाख रुपये झाला आहे.

बदलत्या काळाची साथ... आता सोबतीला सांजवार्ता वेब पोर्टल. ताज्या बातम्यांसाठी अवश्य भेट द्या.
www.sanjwarta.in